# पिंपरी चिंचवड महानगरपालिका
## ग प्रभाग कार्यालय
## कार्यपत्रिका क्रमांक - ९
## सभावृत्तांत

दिनांक - ५/१२/२०१८ वेळ - **सकाळी** ११:०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या **ग** प्रभाग समितीची मासिक सभा बुधवार दि.५/१२/२०१८ रोजी सकाळी ११.०० वाजता ग प्रभाग कार्यालयाचे **"ग्रामदैवत बापुजी बुवा सभागृह"** येथे आयोजीत करणेत आली होती सदर सभेस खालीलप्रमाणे मा.नगरसदस्य उपस्थित होते.

१. **मा.बाबासाहेब (बाबा) त्रिभुवन - सभापती**
२. मा.कदम निकीता अर्जुन
३. मा.संदीप बाळकृष्ण वाघेरे
४. मा.पवार मनिषा प्रमोद
५. मा.बारणे अर्चना तानाजी
६. मा.अभिषेक गोविंद बारणे
७. मा.कैलास ऊर्फ बाबा भालचंद्र बारणे
८. मा.भोसले सचिन सुरेश
९. मा.चंद्रकांत बारकु नखाते
१०. मा.संदिप काशिनाथ गाडे - स्विकृत सदस्य
११. मा.विनोद हनुमंत तापकीर - स्विकृत सदस्य

तसेच खालीलप्रमाणे अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते.

श्रीम.स्मिता गंगाराम झगडे – क्षेत्रिय अधिकारी, श्री.व्ही.एम.गायकवाड – मुख्य लिपिक, श्री.ए.के.सुपे - लेखाधिकारी, श्री.एस.एस.कुलकर्णी – सहा.आरोग्य अधिकारी, श्री.देवन्ना गट्टुवार – कार्यकारी अभियंता (स्थापत्य), श्री.रामदास तांबे – कार्यकारी अभियंता,पाणीपुरवठा, श्री.विजयकुमार काळे – उपअभियंता स्थापत्य, श्री.आर.डी.सुर्यवंशी - कनिष्ठ अभियंता, श्री.बाबासाहेब गलबले - कार्यकारी अभियंता,विद्युत, श्री.दिलीप धुमाळ – उप अभियंता,विद्युत, श्री.बंडगर एस बी – कनिष्ठ अभियंता,जलनि:सारण, श्री.भाऊसाहेब साबळे – उपअभियंता, पाणीपुरवठा, श्री.पी पी पाटील – कार्यकारी अभियंता,जलनि:सारण, श्री.मगर एस एम –कनिष्ठ अभियंता, जलनि:सारण,श्री.मोरमारे – कनिष्ठ अभियंता, पाणीपुरवठा, श्री.मोमीन ए. ए , श्रीम.सानप ए.व्ही, श्रीम.घोडके पी पी,श्री.कोरेवार,

श्री.गजपुरे व्ही पी, कलाल आय के – कनिष्ठ अभियंता,स्थापत्य, श्री.जे व्ही पटेल – सहाय्यक उद्यान अधिक्षक, श्री.जी एन खैरे – सहा.उद्यान निरीक्षक, श्री.बी के तापकिर – उद्यान सहाय्यक, इ. कर्मचारी उपस्थित होते.

-----

सर्व सन्मा.सदस्य व अधिकारी यांचे स्वागत करुन सभेला सुरवात करणेत येत आहे.

दि. १३/११/२०१८ चे मासिक सभेचा सभावृत्तांत ( कार्यपत्रिका क्र. ८) कायम करणेत येत आहे.

ठराव क्रमांक - २९ विषय क्रमांक - १
दिनांक- १३/११/२०१८
सूचक- मा.कैलास बारणे अनुमोदक- मा.अभिषेक बारणे

**संदर्भ – मा.**संदीप बाळकृष्ण वाघेरे यांचे दिनांक २२/१०/२०१८ चे पत्र

मा.संदीप बाळकृष्ण वाघेरे यांचे दिनांक २२/१०/२०१८ चे पत्रानुसार पिंपरी येथील पवनेश्वर मंदिराजवळ १५ मीटर व १८ मीटर डी.पी एकत्र येऊन सदर ठिकाणी चौक तयार होणार आहे. सदर चौकास कै.साथी दामुआण्णा कुदळे (मा.सरपंच) असे नामकरण करण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

------

## सभा कामकाजात ऐनवेळी दाखल करुन घेणेत आलेला विषय खालीलप्रमाणे

ठराव क्रमांक - ३० विषय क्रमांक - २
दिनांक- १३/११/२०१८
सूचक- मा.निकीता कदम अनुमोदक- मा.मनिषा पवार

**संदर्भ – मा.अर्चना बारणे** यांचे दिनांक ५/१२/२०१८ चे पत्र

मा.अर्चना बारणे यांचे दिनांक ५/१२/२०१८ चे पत्रानुसार प्रभाग क्र.२३ मधील स्ट्रीट लाईट पोल वर जास्त प्रमाणात अनाधिकृत फ्लेक्स व खाजगी कंपन्याच्या इंटरनेट केबल, टीव्ही केबल स्ट्रीट पोल वर टाकल्या जातात. याची कुठेही परवानगी घेतली जात नाही. फ्लेक्सच्या बाबतीत कंपन्यांची जाहिरात म्हणुन फ्लेक्स बनवुन स्ट्रीट पोलवरती फ्लेक्स लावतात याबाबत कुठेही परवानगी घेत नाही व स्ट्रीट पोल वर लावणे हे चुकीचे आहे, यावर कुठेही कारवाई होत नाही यामुळे जास्त प्रमाणात पोल वर फ्लेक्स लावले जातात यामुळे शहराचे विद्रुपीकरण होते व नागरिकांना याचा त्रास होतो. तरी सर्व स्ट्रीट पोलवरील अनाधिकृत कुठल्याही बाबतीतले नाहक ओझे काढुन टाकणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

------

**दि. ५/१२/२०१८ रोजी सकाळी ११.०० वाजता ग प्रभाग कार्यालयाचे मासिक सभेत खालीलप्रमाणे चर्चा झाली.**

मा.अध्यक्ष श्री.बाबासाहेब त्रिभुवन यांचे अनुमतीने सभेस सुरुवात करण्यात आली.

**मा.सचिन भोसले –** सभेमध्ये प्रत्येक विभागासंदर्भात चर्चा व्हायला हवी. विद्युत विभागाने सन २०१७ – २०१८ या कालावधीत काय कामे केली, वीजेचे किती खांब बदलले, किती एलईडी बसविले यासंदर्भात योग्य ती माहिती द्यावी.

**मा.संदिप गाडे -** ग क्षेत्रिय कार्यालयाचे सभागृहातील माईक संदर्भात मा.चंद्रकांत नखातेंनी विषय मांडला होता, १ महिन्यात नवीन माईक देतो असे सांगण्यात आले होते, परंतु सदर कामाची अंमलबजावणी झालेली नाही.

**श्री.सतिष तायडे (कनिष्ठ अभियंता,विद्युत) –** वॉर्ड क्र.२४ मधील चालु कामे २४ होती. एकुण २०९८ फिटींग आहेत.

**मा.सचिन भोसले –** विद्युत विभागाचे कामाबद्दल संपुर्ण माहिती द्या. एकुण किती कोटीची कामे होती.

**श्री.सतिष तायडे (कनिष्ठ अभियंता,विद्युत) -** नुतनीकरणाच्या कामामधुन एलईडी बसवलेय. विद्युत विभागाचे कामाबद्दल पत्राव्दारे लवकरात लवकर माहिती देण्यात येईल.

**मा.सचिन भोसले –** नुतनीकरणाच्या कामातुन एलईडी बसवता येतात का? किती एलईडी चे बजेट आले होते, एलईडी साठी किती तरतुद होती? सन २०१७ – २०१८ मध्ये एकुण किती एलईडी बसवले? सन २०१७ – २०१८ मध्ये मेंटेनन्सची किती कामे केली. सर्व विभागांनी आपले विभागातील कामाविषयी माहिती द्यावी.

**मा.चंद्रकांत नखाते –** मिटींग हॉल मधील माईकचे काम सांगुन एक वर्ष झाले तरी अजुन तरतुद का झाली नाही. नवीन माईक सिस्टीम का घेतले नाही?

**मा.बाबासाहेब (बाबा) त्रिभुवन (अध्यक्ष) -** पुढील मासिक सभेपर्यंत नवीन माईक बसविणेत यावे.

**श्रीमती स्मिता झगडे ( प्रभाग अधिकारी) -** सर्व विभागप्रमुखांनी त्वरीत माहिती द्यावी.

**मा.चंद्रकांत नखाते –** ग क्षेत्रिय कार्यालयात मागील वर्षात किती कामे झाली? प्रभाग क्र.२१,२३,२४ व २७ ची किती कामे घेतली आहेत, याचा खुलासा करावा.
संपुर्ण ग प्रभागामध्ये किती काम झाले? टेंडर भरल्यानंतर जो कमीत कमी रेट असेल, त्यास लगेचच ऑर्डर दिली पाहिजे. कामे झपाटयाने झाली पाहिजे.

## जलनि:सारण व स्थापत्य

**मा.संदिप वाघेरे** - स्थापत्य व जलनि:सारण यांनी co-ordination करुन, नागरिकांनी स्टॉर्म वॉटरला जोडलेले ड्रेनेज लाईन कनेक्शन बंद करावेत व ते ड्रेनेज लाईनला जोडुन घ्यावे, त्यामुळे जे नाले वाहत आहेत ते बंद होतील.

**मा.मनिषा पवार** – प्रभागातील ड्रेनेजची कामे होत नाही. प्रभाग क्र.२३ मधील पडवळ नगर, पवार नगर येथे ड्रेनेजच्या समस्या आहेत.

**उद्यान विभाग**

**मा.सचिन भोसले** - प्रभागात किती झाडे लावली, याबाबत संबंधित नगरसेवकांना माहिती द्या.

**श्री.बी.के.तापकीर(उद्यान सहाय्यक)** – प्रभाग क्र.२४ मध्ये सन २०१७ – २०१८ मध्ये ३२७ झाडे लावण्यात आली.

**मा.संदिप वाघेरे** – झाडांना पाणी घालायला माणुस नाही, यामुळे झाडे वाळली आहेत. साधु वासवानी गार्डन येथे कचरा उचलला जात नाही.

**श्रीमती स्मिता झगडे ( प्रभाग अधिकारी)** - उद्यानातील साफसफाईचे कामाबाबत योग्य ती माहिती द्यावी.

**मा.चंद्रकांत नखाते –** उद्यानांमधील टॉयलेट साफसफाईचे काम कोणामार्फत केले जाते?

**मा.कैलास बारणे** – आरोग्य विभागाचे लोकांना उद्यानांमधील कामांसाठी राबवले जाते. थेरगाव बोट क्लब, बापुजी बुवा उद्यान येथे मेंटेनन्सची कामे राहिलीय. त्याचप्रमाणे उद्यानांबद्दल मागविलेली माहिती अजुनही देण्यात आलेली नाही.

**श्री.जे.व्ही पटेल (सहा.उद्यान अधिक्षक)** – ठेकेदारांमार्फत चालविल्या जाणा-या उद्यानांमधील साफसफाईचे काम हे ठेकेदारांमार्फतच केले जाते. परंतु मनपा मार्फत ज्या उद्यानांची देखभाल केली जाते त्यामधील साफसफाईचे काम हे आरोग्य कर्मचा-यांकडुनच केले जाते.

**आरोग्य विभाग**

**मा.सचिन भोसले –** पुढील ८ दिवसात माहिती देणे अपेक्षित आहे.
मासिक सभेसाठी काही विभागातील अधिकारी हजर राहत नाहीत, त्यांचेवर कारवाई करा. वॉर्डमध्ये रोटेशनप्रमाणे औषध फवारणी झाली पाहिजे. धुरीकरणापेक्षा औषध फवारणी करणे अधिक फायदेशीर आहे, त्यासाठी Man power वाढवा. त्याप्रमाणे रोटेशन Schedule बनवा.
प्रभाग क्र.२४ मध्ये ४७ कर्मचारी कमी आहेत, याबाबत १० दिवसात माहिती द्या.

**मा.चंद्रकांत नखाते -** संपुर्ण ग प्रभागाकरीता १५० कर्मचारी वाढीव घेणेची मागणी केलेली आहे.

**मा.निकीता कदम –** प्रभाग क्र.२१ मध्ये झाडु मारणारे कर्मचारी येत नाहीत, कचरा साफ केला जात नाही, नाले सफाई होत नाही, कच-याखालील मातीचे ढीग रस्त्यावर तसेच राहतात.
महिना महिना काम केले जात नाही तसेच मुकादम येत नाही.

**मा.सचिन भोसले -** प्रभाग क्र.२४ मध्ये थेरगाव गावठाण रोडवरील २ कचराकुंडया तिथुन हलविण्यात याव्या.

**मा.संदिप गाडे –** गुजर नगर सबवे गेटजवळ कचरा टाकु नये असा बोर्ड बसवुन घ्या.

**मा.चंद्रकांत नखाते –** सफाई कर्मचा-याची कामाची वेळ संपली असली तरी त्याने पुढील भागातील सफाईकाम पुर्ण करावे. त्या त्या भागातील रस्ते झाडणा-या कर्मचा-याचे नाव व मोबाईल नंबर तेथील रहिवाश्यांना देणेत यावे.

**श्रीमती स्मिता झगडे ( प्रभाग अधिकारी) -** निविदेमध्ये असे लिहायला हवे की , सुपरवायझिंग साठी प्रत्येक ठेकेदार संस्थेमागे एक सुपरवायझर पाहिजे.
सुपरवायझर लेव्हलचा अधिकारी द्या असे ठेकेदाराला सांगा.

**मा.संदिप गाडे –** गुटखा खाऊन थुंकणा-यांवर व कचरा टाकणा-यांवर कारवाई करा.

**पाणीपुरवठा विभाग**

**मा.निकीता कदम –** प्रभाग क्र.२१ जमतानी चौक येथे पाणी गळती सुरु आहे.

**मा.संदिप गाडे -** प्रभाग क्र.२३ व २४ मध्ये अमृत योजनेची काय कामे सुरु आहे. कुठे पाईपलाईन टाकणार आहे याची माहिती नगरसदस्यांना देणेत यावी.

**श्री.रामदास तांबे (कार्यकारी अभियंता पाणीपुरवठा) –** श्री.साबळेंनी याबाबत माहिती द्यावी.

**श्री.भाऊसाहेब साबळे (उप अभियंता,पाणीपुरवठा)–** कनिष्ठ अभियंता व DRA कन्सल्टंट यांना माहिती द्यायला सांगितले आहे.

**मा.मनिषा पवार –** पडवळ नगर, श्रीकृष्ण कॉलनी, लेन नंबर – २ येथे पाणी येत नाही.

**मा.कैलास बारणे –** लक्ष्मी नगर येथील टाकी पाडल्यानंतर तेथे पर्यायी व्यवस्था काय केली आहे, याबाबत माहिती द्यावी.

**श्री.रामदास तांबे (कार्यकारी अभियंता पाणीपुरवठा) -** टाकी पाडल्यानंतर पाणीपुरवठयाची व्यवस्था केलेली आहे. बायपास तसेच बुस्टर ची व्यवस्था आहे.

**मा.संदिप गाडे –** लक्ष्मीनगर पाण्याच्या टाकीजवळ जुने पाईप पडलेय, ते तेथुन हलविण्यात यावे.

**श्री.रामदास तांबे (कार्यकारी अभियंता पाणीपुरवठा) -** सध्या गोडाऊन नसल्यामुळे सदर पाईप्सची यादी करुन भांडार विभागाला पाठवलीय.

**मा.बाबासाहेब (बाबा) त्रिभुवन (अध्यक्ष) -** कुणाल हॉटेल ते नखाते वस्ती पासुनची खोदाई २ महिन्यापासुन झालीय, अजुन कॉंक्रिटीकरण झालेले नाही.

**मा.चंद्रकांत नखाते –** एकाच भागाला पाणी सोडुन पाहिले तरी पाणी येत नाही. पिंपळे निलख मधल्या काही भागास सकाळचे ऐवजी संध्याकाळी व काही भागात संध्याकाळचे ऐवजी सकाळी पाणी सोडुन पहावे. तसेच रहाटणी शिवराज नगरमध्येही पाण्याची वेळ बदलण्यात यावी.

**श्री.रामदास तांबे (कार्यकारी अभियंता पाणीपुरवठा) –** Air wall लावुन पाईपलाईन टाकलेनंतर पाणीपुरवठा सुरळीत झाला की कॉंक्रीटीकरण लगेच करुन घेऊ,

**प्राथमिक व माध्यमिक शिक्षण विभाग**

**मा.संदिप गाडे -** प्राथमिक व माध्यमिक शाळांमधील कार्यक्रमांचे आमंत्रण नगरसदस्यांनाही देणेत यावे.
शाळेसंदर्भातील काही अडचणी असल्यास प्रभाग समिती सभेमध्ये मांडण्यात याव्या.
खिचडी वाटपासाठी असलेल्या ठेकेदाराची माहिती द्या.

वरीलप्रमाणे नेमुन देण्यात आलेल्या कामकाजाचा आढावा पुढील बैठकीमध्ये घेण्यात येईल असे सांगुन सर्वांचे आभार मानुन मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहीर केले.

**अध्यक्ष**
**ग प्रभाग समिती**
**थेरगाव– ३३.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
ग क्षेत्रीय कार्यालय, थेरगाव - ३३
क्र-गक्षेका/कावि/४/ /२०१८
दिनांक - २६/१२/२०१८

**प्रशासन अधिकारी तथा सचिव (सभाशाखा)**
**क्षेत्रीय कार्यालय,**
**थेरगाव – ३३**

प्रत- सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी

२/- आपले विभागाशी संबंधित असणा-या विषयाबाबत झालेल्या ठरावानुसार नियमाधीन कार्यवाही करणेत यावी, यासंदर्भात वेगळा पत्रव्यवहार केला जाणार नाही